Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षण विषयक विचार

**प्रा. डॉ. विलास तुळशिराम ठाकूर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री शिवाजी कॉलेज, कंधार
vilasthakur13@gmail.com

**प्रस्तावना:**

यशवंतराव चव्हाण यांचा जन्म 12 मार्च 1914 रोजी सातारा जिल्हयातील देवराष्ट्र या गावी एका गरिब कुटूंबात झाला. यशवंतरावांनी खेडेगाव हा केंद्रब्रिदू मानून विविध योजना आखल्या. त्यांनी कृषी, औद्योगिक क्रांतीचा पाया घातला. कराड या यशवंतराव चव्हाण यांच्या कर्मभुमी असलेल्या गावी जर आपण गेला तर सुजलाम् - सुफलाम झालेली शेती. साहित्याची गंगोत्री, सहकाराची प्रगती, शैक्षणिकदृष्ट्या सुधारलेले कराड आपल्या दृष्टीस येईल. एक चौफेर व्यक्तिमत्व, अष्टपैलू हिरा व सर्वगुणसंपन्न असा हा थोर महात्मा सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात वाढला व सह्याद्री एवढाच नावारुपाला आला. अशा या प्रतिभा संपन्न लोकनेत्याचा प्रत्येक मराठी माणसाला अभिमान वाटतो. त्यांनी महाराष्ट्र व देशाच्या राजकारणात मुख्यमंत्री, संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री आणि उपपंतप्रधान म्हणून त्यांचा प्रवास यशस्वी झाला आहे. आर्थिक विकास हा त्यांच्या विचारांचा मुख्य गाभा असून, महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या अनेक दिशा त्यांनी त्यांच्या भाषणातून दाखविल्या आहेत. त्यांनी शेती, उद्योग, व्यापार, नियोजन, प्रादेशिक विकास, करासंबंधी, काळयापैशा संदर्भात, चलनवाढीसंबंधी, आर्थिकतुट, सहकार, रोजगार, शिक्षण विषयक, कृषी आधारीत उद्योग, जमीनसुधारणा विषयक, आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण, पाटबंधारे योजना, दारिद्र्याची संकल्पना इत्यादी विषयी आपल्या भाषणातून विचार मांडलेले आहेत.

**उद्दिष्टे :**

1) यशवंतरावांनी त्या काळात शिक्षणाविषयी महत्व लोकांना पटवून दिले.
2) त्यांनी उच्च शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतुदीसाठी शासनाकडे शिफारस केली.
3) व्यावसायीक व तांत्रिक शिक्षणाला महत्वाचे स्थान आर्थिक विकासात दिले.
4) दुर्बल घटकांना उच्च शिक्षणाचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले.
5) मागास व आदिवासी घटकासाठी विशेष सुविधा निर्माण करुन दिल्या.

**शिक्षणाचे महत्व:**

उच्च शिक्षण घेण्यासाठी यशवंतरावांना स्वत: अत्यंत खडतर परिश्रमातून जावे लागले होते. त्यामुळे तळागाळातील लोकांना शिक्षणाचे महत्व पटवून देवून त्यासाठी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर स्थापन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात यशवंतरावांनी प्रयत्न कले व व्यक्तीचा सर्वांगीण विकास साधावयाचा असेल तर शिक्षण हेच महत्वाचा घटक आहे. हे सांगून शिक्षणाची गंगा सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम त्यांनी केले.

असत्याकडून सत्याकडे, अंधाराकडून प्रकाशाकडे, मृत्युपासून अमृताकडे या अमृत्वाच्या प्राप्तीसाठी यशवंतराव चव्हाण यांच्या पुढाकाराने महाराष्ट्रामध्ये शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या पुढाकाराने स्थापन झाले. या विद्यापीठाचे घोष वाक्य होते. ज्ञानमेवामृत्म् आता ज्ञान हेच अमृत आहे. या अमृताने तुम्हाला समर्थ बनवावयाचे आहे. समाजजीवन समर्थ बनवाये आहे. अशी कितीतरी नविन नविन शास्त्रे आहेत की, त्या शास्त्रांचा आपण उपयोग करु शकतो. तर हिंदूस्थानचे जीवन आपणास एका पराकोटीला पोहोचविता येईल अशा प्रकारचा विचार यशवंतरावांनी शिक्षणासंबंधी मांडला.

1) उच्च शिक्षणासाठी निधीची तरतूद :-

यशवंतरावांनी राज्याच्या एकूण खर्चाच्या 1/5 इतक्या रक्कमे एवढीच तरतूद शिक्षणासाठी वाढ होते. त्यामध्ये त्यांनी वाढ करुन ती तरतुद अर्थात 20 कोटीची तरतुद शिक्षण कार्यात होती. परंतु दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात ती 23 कोटी 75 लाखापर्यंत वाढवण्यासाठी यशवंतरावानी विशेष प्रयत्न केले.

2) व्यावसायिक शिक्षणाची जोड :

यशवंतरावानी शिक्षणाच्या संदर्भात ग्रामीण व शहरी अशा दोन घटकात वर्गीकरण केले असून ग्रामीण शेतीविषयक शिक्षणाकडे त्यांचा ओढा होता. शिक्षणामुळे पात्रता आणि सामर्थ्य प्राप्त होते. शिक्षणामुळे मानवी मूल्य आणि ध्येय वृध्दिंगत होता. आचार - विचार आणि परंपरेत सुधारणा घडून येते. समजसपण, बुध्दीनिष्ठा, सहिष्णुवृत्ती आणि मानवतेवरील श्रध्दा इतर वृध्दी झाल्याने समाजाची वैचारिक पातळी उंचावून मनुष्यबळाचा विकास होतो आणि आथिक प्रगती साध्य केली जाऊ शकते.

3) मोफत शिक्षणाची तरतूद व दुर्लक्षीत घटकाकडे लक्ष :

शाहू महाराजांच्या नंतर यशवंतरावांनी मोफत शिक्षणाची योजना महाराष्ट्रात प्रथमच सुरु करण्यात आली आणि शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुले झाल्यामुळे महाराष्ट्रात शैक्षणिक क्रांती घडून आली. भारतीय घटनेच्या 46 व्या कलमानुसार राज्य सरकारने लोकांच्या विशेषतरू मागासलेल्या लोकांच्या शैक्षणिक व आर्थिक हिताकडे खास लक्ष पुरविण्याची तरतूद करण्यात आली आहे. हे मार्गदर्शक तत्व संपूर्णपणे अमलात आणण्याच्या दृष्टीने सरकारने जात हा निकष आधारभूत न मानता

आर्थिक मिळकत महत्वाची मानली. त्यानूसार सुरुवातीला 900 रुपये ज्या पालकाचे वार्षिक उत्पन्न 1200 रुपये त्यानंतर 4800 रुपयापेक्षा जास्त नसेल अशा गरिब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्यासंबंधी नियम प्रथमच तयार करण्यात आले. याचा लाभ अर्थातच बहुसंख्य समाजाला झाला. आर्थिकदृष्टया पदवी, पदवीत्तर शिक्षणाची सोय उपलबध करुन दिली.

4) सैनिकी स्कूलची स्थापना :

यशवंतराव चव्हाण यांनी सर्वप्रथम सातारा येथे सैनिकी स्कूलची स्थापना करण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे यशवंतरावांचे हे कार्य या क्षेत्रातले चिरंजीवी कार्य आहे. नॅशनल डिफेन्स अकादमीसाठी शिक्षण मिळण्याची सोय साताऱ्याच्या या सैनिकीस्कूलमध्ये उपलब्ध झाली. यासाठी 10% जागा माजी सैनिकांच्या मुलांकरिता राखून ठेवण्याची तरतूद करण्यात आली.

5) आश्रम शाळांची स्थापना :

आदिवासी मुलांसाठी यशवंतराव चव्हाण यांनी एक वेगळा उपक्रम म्हणून आदिवासीच्या मुलांकरीता आश्रमशाळाची योजना साकार करण्यात आली. यामुळे समाजातील व समाजाबाहेरील दुर्लशित घटकाकडे लक्ष वेधण्यात आले. व त्यांच्या शिक्षणाची सोय या आश्रमशाळे मार्फत करण्यात आली.

6) तांत्रिक शिक्षणावर भर :

देशाच्या आर्थिक प्रगतीचे गमक त्यांनी तांत्रिक शिक्षणात व व्यावसायीक शिक्षणात समजले होते. त्यामुळे तांत्रिक व व्यावसायीक शिक्षणावर त्यांचा भर होता. कऱ्हाड या सारख्या तालुकास्तरावर त्यांनी अभियांत्रिकी महाविद्यालय, सुरु करुन ग्रामीण औद्योगिक विकासास गति देण्याचे काम सुरु केले.

7) शिक्षण मातृभाषेबरोबरच इतर भाषेतून द्यावे :-

यशवंतराव चव्हाण यांनी शिक्षण हे मातृभाषेबरोबरच इतर भाषेतून विशेषतरू इंग्रजी व हिंदीमध्ये विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण देण्याची सुविधा शासनाने उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचा विचार मांडला. त्यांनी इंग्रजी व हिंदी भाषेचाही अग्रह धरला होता व या मताचे ते समर्थक होते.

8) शिक्षण क्रांती ही खरी क्रांती :

यशवंतरावांना शैक्षणिक क्षत्ररासंबंधीची तळमळ होती. शैक्षणिक प्रगती दिरंगाई होईल अशी भिती यशवंतरावांना वाटत होती. तेव्हा विद्यापीठ स्थापनेबाबतही अगोदर महाविद्यालय व नंतर विद्यापीठ मान्यता अशी पध्दत होती. पण यशवंतरावांनी येथेही वेगळ्या मार्गाने निर्णय घेवून अगोदर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद स्थापनेस मान्यता दिली. व नंतर महाविद्यालय उघडण्यात आले. पुढे दोन तीन वर्षात अनेक महाविद्यालये निघाली. त्यामुळे समाजातील सर्व स्तरातील लोकांना शिक्षण घेणे शक्य झाल्यामुळे शिक्षणाची खरी क्रांती घडण्यास सुरुवात होऊन त्यातून अनेक

तरुण, तरुणी पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेऊन आज बाहेर पडत आहेत. व्यक्तिच्या सर्वांगिण विकासाला गती द्यावयाची असेल तर शिक्षण हे अत्यंत महत्वाचा घटक आहे. याचे महत्व त्यांना कळाल्यामुळे त्यांनी शिक्षणामध्ये जोपर्यत क्रांती होणार नाही तोपर्यंत गावाचा, राज्याचा, देशाचा विकास होणार नाही म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, तसेच भारतातील पहिली सैनिकी शाळा सातारा येथे स्थापन कऱ्हाड आणि औरंगाबाद येथे अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापन केले. मराठवाड्याच्या औद्योगिक विकासाला चालना दिली व कऱ्हाड सारख्या तालुक्याची निवड अभियांत्रीकीसाठी करुन ग्रामीण जीवनातील तंत्रज्ञानाचे महत्व स्विकारणे सर्व नियोजनकारांना भाग पाडले.

9) खाजगी संस्थाना प्राधान्य

राज्यात नव्याने सामील झालेल्या मराठवाड्याला शिक्षणाचा प्रसार व्हावा आणि दुय्यम शिक्षण देणा-या खाजगी संस्था पुढे याव्यात यासाठी एक योजना तयार करण्यात आली. जेणेकरुन यशवंतरावांनी खाजगी शिक्षण संस्थेस प्राधान्य दिले. अशा पध्दतीने शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र क्रांति घडवून आणणारे अनेक निर्णय यशवंतरावाच्या नियंत्रणाखाली सरकारनं त्यावेळी घेतले. प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे आदी शैक्षणिक सोयींनी महाराष्ट्र जी गजबजलेला, पुढारलेला आढळतो, यशवंतरावांनी दूरदृष्टी ठेवून त्याकाळात घेतलेले निर्णय निर्णयामुळेच खऱ्या अर्थानेच शिक्षणाची ज्ञानगंगा दारोदारी पोहचवण्याचे महत्वाचे कार्य केले आहे.

सारांश :

यावरुन यशवंतराव चव्हाण यांचा दृष्टीकोण हा अधिक विकासोन्मुख वाटतो. आर्थिक विकास व भरभराट यासह सर्व प्रकारच्या प्रगतीचे मुख्य साधन शिक्षण होय. हे त्यांनी जाणले होते. यादृष्टीने त्यांची वाटचाल होती. आर्थिक प्रगतीत साहजीकच तांत्रीक शिक्षणाला अधिक महत्व दिले. सत्तेचा सदुपयोग करणारा कणखर, चारित्र्यशील अशा महाराष्ट्राच्या शिल्पकारामुळेच महाराष्ट्र भकास न होता झकास झाला असे म्हटल्यास ती अतिशेक्ती ठरु नये.

संदर्भ :

1. युगांतर, यशवंतराव चव्हाण यांचे निवडक भाषणे
2. यशवंतराव राष्ट्रीय व्यक्तीमत्व - भा.क्र. केळकर
3. महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण - विठ्ठलराव पाटील
4. मराठवाडा अर्थशास्त्र परिषद, 22 वे वार्षिक अधिवेशन स्मरणीका शोधनिबंध.
5. यशवंतराव चव्हाण एक अष्टपैलू इ संपादक, डॉ. संगीता घुगे, कल्पना डोंबे.